**नवी मुंबई महानगरपालिका**
**स्थायी समिती**
**स्थायी समितीच्या दिनांक १५ सप्टेंबर २०१७ रोजी भरलेल्या सभेतील मंजुर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसूदा स्वरुपात खालीलप्रमाणे आहे:-**

| | |
|---|---|
| **विषय क्र.०१**<br>**दि.१५सप्टेंबर २०१७** | इतिवृत्त कायम करणे :- १) दिनांक ११/०८/२०१७ रोजीचे इतिवृत्त. |
| **ठराव क्र.१०९.**<br>**निर्णय :-** | **कायम केले.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र.०२**<br>**दि.१५सप्टेंबर २०१७** | सन्मा.स्थायी समिती सदस्य श्री .लक्ष्मीकांत नामदेव पाटील यांजकडून दिनांक २१ जूलै,२०१७ रोजीच्या सभेचा ठराव क्र. ५४ बाबत फेरविचार करणेबाबतची सूचना, दिनांक ०८ सप्टेंबर २०१७.<br>(मुळ प्रस्ताव :- सीबीडी अग्निशमन केंद्र २) नेरुळ, सेक्टर-०६ उद्यान, ३) वाशी विभाग कार्यालय आवार आणि ४) कोपरखैरणे ब स डेपो आवारातील जाहिरात फलकांवर जाहिरात करणेबाबतचे हक्क देणेबाबत, आयुक्तांचे दिनांक ०१/०७/२०१७, चे पत्र क्र.नमुंमपा/परवाना विभाग/३५५४/२०१७.) |
| **ठराव क्र.११०.** | **ठरावाची सुचना मंजुर.** |
| **आयुक्तांचा मुळ प्रस्ताव**<br>**ठराव क्र.१११.** | " महानगरपालिकेला अशी शिफारस करण्यात यावी की, उपरोक्त विषयासंदर्भात मे. वालोप ॲडर्व्हटायजिंग या कंत्राटदाराबरोबर 03 वर्षाच्या कालावधीसाठी किंवा सर्वंकष धोरण मान्य झाल्यास शहरासाठी राबविण्यात येणाऱ्या एकत्रित आर.एफ.पी. (Request for porposal) नुसार जे अगोदर येईल त्याकालावधीपर्यंत देण्यास रु.13,20,000/- इतक्या खर्चाने कलम 73 (ड) नुसार करार करण्यास तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे 79 (क) व (ड) अन्वये याप्रमाणे मंजुरकरुन मनपास शिफारस करण्यात यावी. " |
| **निर्णय :-** | **आयुक्तांचा मुळ प्रस्ताव संमतकरुन महानगरपालिकेस शिफारस.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र.०३**<br>**दि.१५सप्टेंबर २०१७** | रुपये पाच लाखापेक्षा जास्त परंतु पंचवीस लाखापेक्षा कमी खर्चाच्या कामासंबंधी केलेल्या कराराबाबत, आयुक्तांचे दिनांक १९/०८/२०१७, चे पत्र क्र.नमुंमपा/श.अ/१५७४/२०१७. |
| **ठराव क्र.११२.**<br>**निर्णय :-** | **दफ्तरी दाखल.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र.०४**<br>**दि.१५सप्टेंबर २०१७** | रुपये पाच लाखापेक्षा जास्त परंतु पंचवीस लाखापेक्षा कमी खर्चाच्या कामासंबंधी केलेल्या कराराबाबत, आयुक्तांचे दिनांक ०७/०९/२०१७, चे पत्र क्र.नमुंमपा/शि.वि./टे.क्र.६/१९५९/२०१७. |
| **ठराव क्र.११३.**<br>**निर्णय :-** | **दफ्तरी दाखल.** |

...2

| | |
|---|---|
| **विषय क्र.०५**<br>**दि.१५सप्टेंबर २०१७** | नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील वाशी  झोन क्र.३ येथील मलनि:स्सारण व्यवस्थेच्या देखभाल, दुरुस्तीचे सर्वसमावेशक कंत्राटास मुदतवाढ देणेबाबत, (दि.०१/०४/२०१७ ते ०१/१२/२०१७) आयुक्तांचे दि.०६/०९/२०१७, चे पत्र क्र.नमुंमपा/श.अ./१६५२/२०१७. |
| **ठराव क्र.११४.** | "उपरोक्त विषयासंदर्भात मे. एम. एन. काळभोर "उपरोक्त या कंत्राटदाराबरोबर सर्वसमावेशक कंत्राटाच्या अंदाजित 245 दिवसासाठी म्हणजे दिनांक 01/04/2017 ते दि.01/12/2017 पर्यंत मुदतवाढ देण्यास कंत्राटाची रक्कम रु.1,31,49,047/- इतक्या खर्चाने करार करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 73 (क) अन्वये याप्रमाणे संमती देण्यात यावी. " |
| **निर्णय :-** | **संमत.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र.०६**<br>**दि.१५सप्टेंबर २०१७** | एकात्मिक विकास योजने अंतर्गत से.१५ सीबीडी येथे नवीन दिवाबत्ती लावणेबाबत, आयुक्तांचे दि.०७/०९/२०१७, चे पत्र  क्र.नमुंमपा/श.अ./१६७४/२०१७. |
| **ठराव क्र.११५.** | "उपरोक्त विषयासंदर्भात मे. ए. एस. इलेक्ट्रीक कॉर्पोरेशन या कंत्राटदाराबरोबर अंदाजित रक्कम रु.१,९९,८४,५९३.०० पेक्षा ६.७७% कमी दराने म्हणजेच रक्कम रु.१,८६,३१,५२६.०० इतक्या खर्चाने करार करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) अन्वये याप्रमाणे संमती देण्यात यावी. " |
| **निर्णय :-** | **संमत.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र.०७**<br>**दि.१५सप्टेंबर २०१७** | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून घेतलेल्या कर्जाच्या हप्त्यांची परतफेड करणेबाबत, आयुक्तांचे दि.०८/०९/२०१७, चे पत्र  क्र.नमुंमपा/लेखा/१६३०/२०१७. |
| **ठराव क्र.११६.** | "उपरोक्त विषयासंदर्भात तक्ता क्र.५ मध्ये प्रस्तावित केल्यानुसार टेबल क्र.७ ते ९ मधील १०% व्याजदराने घेतलेल्या कर्जाची दि.३०.०९.२०१७ रोजी रक्कम रु.१३८.३४ कोटी परतफेड करणे करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १११ अन्वये याप्रमाणे मंजुर करुन मनपास शिफारस करण्यात यावी. " |
| **निर्णय :-** | **मंजूर करुन महानगरपालिकेस शिफारस.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र.०८**<br>**दि.१५सप्टेंबर २०१७** | नेरुळ सेक्टर १९ येथील यशवंतराव चव्हाण मैदान येथे प्रकाश व्यवस्था करणेबाबत, आयुक्तांचे दि.११/०९/२०१७, चे पत्र क्र.नमुंमपा/श.अ./१७०७/२०१७. |
| **ठराव क्र.११७.** | "उपरोक्त विषयासंदर्भात मे. नेमस्त इलेक्ट्रीकल्स या कंत्राटदाराबरोबर अंदाजित रक्कम रु.१,३६,३६,५४०/- पेक्षा २.०% कमी दराने म्हणजेच रक्कम रु.१,३३,६३,८०९/- इतक्या खर्चाने करार करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) अन्वये याप्रमाणे संमती देण्यात यावी. " |
| **निर्णय :-** | **संमत.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र.०९**<br>**दि.१५सप्टेंबर २०१७** | नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नेरुळ झोन क्र.२ मलनि:स्सारण व्यवस्थेच्या देखभाल, दुरुस्तीचे सर्वसमावेशक कंत्राटास मुदतवाढ देणेबाबत, आयुक्तांचे दि.११/०९/२०१७, चे पत्र क्र.नमुंमपा/श.अ./१७०८/२०१७. |
| **ठराव क्र.११८.** | "उपरोक्त विषयासंदर्भात मे. मंगलमुर्ती एंटरप्रायजेस यांना नवीन निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन कंत्राटदारास कार्यादेश देईपर्यंत किंवा दिनांक ०१/०६/२०१७ ते ०४/१२/२०१७ पर्यंत यापैकी जे आधी असेल त्या कालावधीसाठी मुदतवाढ देणेच्या कंत्राटासाठी एकूण रु.९१,६९,५०६/- इतक्या खर्चाने करार करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या ७३ (क) नुसार याप्रमाणे संमती देण्यात यावी. " |
| **निर्णय :-** | **संमत.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र.१०**<br>**दि.१५सप्टेंबर २०१७** | सन २०१६-२०१७ या वर्षाकरिता नवी मुंबई महानगरपालिका अधिकारी/ कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान अदा करणेबाबत, आयुक्तांचे दि.११/०९/२०१७, चे पत्र क्र.नमुंमपा/प्रशासन/आस्था-१०/३१९०/२०१७. |
| **ठराव क्र.११९.** | " महानगरपालिकेला अशी शिफारस करण्यात यावी की, नवी मुंबई महानगरपालिकेच्या नियमित सेवेत असलेले अधिकारी व कर्मचारी, (प्रतिनियुक्तीवरील अधिकारी/कर्मचारी यांच्यासह) आणि ठोक पगारावरील, करारपध्दतीवर वेतनश्रेणीमध्ये कार्यरत असलेले अधिकारी व कर्मचारी, रोजंदारीवरील (आरोग्य सेवक), मानसेवी अधिकारी/कर्मचारी इत्यादी यांना सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षाकरिता आयुक्तांच्या उपरोक्त पत्रामध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीवर शासनाच्या धर्तीवर सानुग्रह अनुदान आणि आयुक्तांनी प्रस्तावित केलेल्या रु.१७,०००/- या ऐवजी रु.१९,०००/- आणि ठोक पगारावरील, रोजंदारीवरील (आरोग्य सेवक), मानसेवी अधिकारी/कर्मचारी यांना मिळणारी एकत्रित रक्कम किमान रु.९५००/- किंवा वेतनाच्या २५% रक्कम यापैकी जी जास्त असेल ती रक्कम या ऐवजी रु.१२०००/- इतके सानुग्रह अनुदान देण्यास, मंजुरकरुन मनपास शिफारस करण्यात यावी." |
| **निर्णय :-** | **उप सुचनेसह मंजूर करुन महानगरपालिकेस शिफारस.** |

**तयार केले :-**

1) राजेंद्र शा.पवार (मा.नो./लि.) -----------

2) अशोक र.देसाई (मा.नो./लि.) -----------

3)चेतन चं. कोळी (भांडारपाल/लि.)---------

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
महापालिका सचिव
नवी मुंबई महानगरपालिका